



AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

SCHOLARLY RESEARCH JOURNALS

We Publish Conference, Seminar, Proceeding With ISBN, ISSN
Address: TCG-5 Saidatta Niwas, Ph-II, Nr. Telco Colony & Blue Spring Society,
Dattanagar, Ambegaon, Pune-411046.
For More Details Contact Mob: 9881595917.
Web Address: www.srjis.com

भारतीय समाज आणि विकास प्रक्रिया

APRIL-JUNE,2022, VOL - 10, ISSUE - 53


IMPACT FACTOR (SJIF) 2021 = 7.380 ISSN 2319-4766

AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2022, VOL - 10, ISSUE - 53


मुंबई विद्यापीठ संलग्नित

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे

आर. पी. गोगटे कला व विज्ञान आणि आर. व्ही. जोगळेकर
वाणिज्य महाविद्यालय, रत्नागिरी

आणि

मराठी समाजशास्त्र परिषद
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दिनांक 11-12 एप्रिल 2022

# मराठी समाजशास्त्र परिषदेचे 31 वे राष्ट्रीय अधिवेशन

## भारतीय समाज आणि विकास प्रक्रिया

संपादक



# RC-10

# INDEX


| SR. NO. | TITLE & AUTHOR NAME |
|---|---|
| 1 | नांदेड जिल्ह्यातील भिल्ल जमातीवर शासनाच्या शैक्षणिक योजनांचा परिणाम : एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>*डॉ. श्रीनिवास पिलगुलवार* |
| 2 | बंजारा जमातीचे ग्रामीण क्षेत्रातील बदलत्या जीवनशैलीचे समाजशास्त्रीय अध्ययन (सीमांतिक समुह)<br>*कु. गोदावरी विठ्ठल बन* |
| 3 | भारतातील जाती असहिष्णुता<br>*प्रा. डॉ. मेघराज रा.शिंदे* |
| 4 | महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती आणि समस्या<br>*डॉ. राजेंद्र फकिरा बगाटे* |
| 5 | गोंड आदिवासी महिलांचे राजकीय जीवन<br>*डॉ.फोले कविता भाऊराव आणि डॉ. भिसे आर.एम.* |
| 6 | पितृसत्ताक पद्धती आणि स्त्रियांच्या मानवी हक्कांचे हनन<br>*डॉ. साहेब विरभद्रराव पडलवार* |
| 7 | आदिवासी विकास आणि वर्जिततेचा प्रश्न : क्षेत्रिय अवलोकन<br>*बाबुराव जाधव आणि जी. एस. येळणे* |
| 8 | वृद्धांच्या सामाजिक समस्या – एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>*डॉ. रविंद्र विठोबा विखार* |
| 9 | गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासीच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>*प्रा. डॉ. विठ्ठल चव्हाण* |
| 10 | भारतीय समाजातील वृद्धांच्या समस्येचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>*प्रा. धर्मदास वी. घोडेस्वार* |
| 11 | पूर्व विदर्भातील सिकलीगर भटक्या समुदायामधील कौटुंबिक-वैवाहिक अभिवृत्ती मधील परिवर्तन<br>*दिलीप जीवन रामटेके आणि डॉ. संजय कुंभारे* |


Scanned with CamScanner

Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies SJIF 2021=7.380 ISSN: 2319-4766

# नांदेड जिल्ह्यातील भिल्ल जमातीवर शासनाच्या शैक्षणिक योजनांचा परिणाम: एक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. श्रीनिवास पिलगुलवार**
*समाजशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय वरोरा, जि. चंद्रपूर*
*Email Id- snpilgulwar@gmail.com*

## प्रस्तावना

मानवी जीवनात शिक्षणास अनन्य साधारण असे महत्त्व आहे. शिक्षणामुळे नियोजित सामाजिक बदलाच्या(Planned Social Change) प्रक्रियेबरोबर विकासासही गती मिळते. शैक्षणिक गुणवत्तेचा विकास व त्याचा त्यांच्या कुटुंबीयास होणाऱ्या फायद्या बरोबर समाजासही निश्चितच फायदा होऊ शकतो. कारण शिक्षणामुळे अधिक कसदार व अधिक कार्यक्षम असे मानवी भांडवल निर्माण होते. आदिवासी समाज अज्ञानाचा आणि दारिद्र्याच्या अंधारात चाचपडत आहे. खऱ्या अर्थाने या समाजाच्या प्रगतीस गती मिळवून देण्याची कुवत केवळ शिक्षणाच्या प्रक्रियेत आहे. असे म्हणणे अतिशयोक्तीचे निश्चितच होणार नाही. आदिवासींच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षण क्षेत्राचा फार मोठा वाटा आहे. हे तत्वतः मान्य करून यासंदर्भात शासनाचे आणि त्याचबरोबर खाजगी स्वयंसेवी संस्थांचे कार्य सुरू झालेले आहे. ( गारे,1994, पृ. क्र.31)

भारतातील सर्वच आदिवासींची ओळख ही वंचित समूह (Marginalized Group) म्हणून झाली आहे. भारतातील सर्व आदिवासींना आज पर्यंत उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित, बहुजन म्हणून पाहण्यात आले आहे. अशा बहुजनांच्या शिक्षणाचा विचार स्वातंत्र्यपूर्व कालखंडात अगदी मोजक्याच स्वरूपात झाला होता. परंतु स्वतंत्र भारतात अशा बहुजनांच्या शिक्षणाकडेही शासनाने लक्ष देण्यास सुरुवात केली. नांदेड जिल्ह्यातील भिल्ल जमात की सुद्धा उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित , मागास आदिवासी जमात म्हणून ओळखली जाते. अशा बहुजन जमातीच्या शिक्षणाचा व त्या जमातीवर पडलेल्या अनेक योजनांच्या परिणामांचा अभ्यास करण्यापूर्वी बहुजन कोणास म्हणावे हे पाहणे क्रमप्राप्त ठरते." "बहुजनांच्या शिक्षणाचा विचार करण्यापूर्वी बहुजन म्हणजे कोण, बहुजन म्हणायचे कोणाला, हे प्रथम लक्षात घ्यायला हवे. बहुजन किंवा बहुजन समाज हे शब्द सतत आपल्या कानावर पडत असतात. बहुजन किंवा बहुजन समाज या शब्दाचा आशय प्रथम आपण भारतीय समाजाच्या संदर्भात शोधला पाहिजे. भारतीय समाजात अनेक लोकसमुदायांचा समावेश होतो. त्यांचा संबंध विविध धर्म संप्रदायाशी असतो आणि म्हणून आजच्या परिस्थिती बहुजनांचा विचार केवळ हिंदू समाजाच्या संदर्भातच करून चालणार नाही. हिंदू धर्मीयां मधील विविध स्तरातील लोकांचा विचार करीत असताना वर्णव्यवस्था अर्थात जातीव्यवस्था लक्षात घेणे गरजेचे आहे. वर्णव्यवस्थेत ज्यांना शूद्र आणि अतिशूद्र संबोधण्यात येत होते,ते सर्व बहुजनात समाविष्ट होतात. गावगाड्यातील शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन, दारिद्र रेषेखालील लोक, बलुतेदार व आलुतेदार या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या जाती हे सर्व बहुजनांमध्ये समाविष्ट असतात. गावगाड्यात स्थिर झालेल्या व न झालेल्या भटक्या- विमुक्त लोकांची गणनाही बहुजनात करणे भाग आहे. दऱ्याखोऱ्यात व दुर्गम भागात राहणारे आदिवासी यांचादेखील विचार बहुजनांच्या संदर्भातच करणे आवश्यक आहे. जे सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा आणि जगण्याची खात्रीदायक साधने यांच्या पासून वंचित आहेत , सर्व बहुजनच आहेत. अशा वंचित जन आणि बहुजनांची संख्या भारतात जवळपास 85% आहे. अशा वंचित आणि उपेक्षित समूहां पैकी नांदेड जिल्ह्यातील भिल्ल जमात आहे." ( वाघमारे,2009, पृ. क्र.75)

## नांदेड जिल्ह्यातील भिल्ल जमात

नांदेड हे मराठवाड्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. औरंगाबाद नंतर नांदेड शहराचा क्रमांक लागतो. संपूर्ण नांदेड जिल्ह्याची लोकसंख्या सुद्धा आज जवळपास 35 लाखाच्या आसपास आहे. प्राचीन काळी नांदेड परिसर राजकीय दृष्ट्या फार महत्त्वाचा भाग्यशाली परिसर होता. येथे काही राजधान्या व उपराजधानी होत्या. कंधार ही त्याकाळच्या मातब्बर अशा राष्ट्रकूट घराण्याची तर होट्टल ( ता. देगलूर) ही कल्याणी



Scanned with CamScanner

चालूक्यांची राजधानी होती. तसेच आराध्यपूर म्हणजे आजचे अर्धापूर हे रठ्यांची उपराजधानी होती. नांदेड व परिसराची नोंद युरोपियन प्रवासी ट्रॅवर नियर यांच्या प्रवासवर्णनात मिळते. त्यांनी 16 45 मध्ये नांदेड या गावी भेट दिली होती. असा संदर्भ मिळाला आहे. म्हणजेच नांदेड जिल्हा मध्ये कालखंडापासून अस्तित्वात असल्याचे ऐतिहासिक दाखले मिळतात.( जिल्हा गॅझेटिअर,2011, पृ. क्र.111) नांदेड जिल्ह्यातील गोदावरी आणि पैनगंगेच्या परिसरात निसर्गरम्य अशा घनदाट जंगलात आणि दऱ्याखोऱ्या मध्ये आदिवासींची वस्ती पाहायला मिळते. महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमाती पैकी गोंड, परधान, भिल्ल, कोलाम आणि अंध इत्यादी आदिवासी जमातीचे लोक नांदेड जिल्ह्यात वास्तव्यास असलेले दिसून येतात. नांदेड जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये भिल्ल जमातीच्या लोकांचे वास्तव्य आहे. वविशेषतः भोकर, किनवट, हिमायतनगर, हदगाव परिसरात भिल्ल जमातीच्या लोकांचे वास्तव्य आहे. भिल्लांच्या वास्तव्य यासंबंधी विचार करताना भिल्लांच्या धनुष्यबाण यांचा संबंध त्यांच्या भिल्ल या नामाभिधानाशि जोडला जातो." तामिळ भाषेतील काही आदिकाव्यांमधून आदिवासींना ' बिल्लूवरू' असे संबोधले आहे.( नाईक,1956) . महाराष्ट्रातील आणि देशातील सर्वाधिक लोकसंख्या असलेलि भिल्लअतिप्राचीन जमात आहे. महाराष्ट्र शिवाय राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, आंध्र प्रदेश, इत्यादी राज्यातही ही जमात आढळून येते.

**पूर्व साहित्याचा आढावा**

**(1) गारे गोविंद (1998)**

यांचे नाव एकविसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आदिवासी जमातीचा अभ्यास करणाऱ्या विचारवंतांमध्ये अग्रगण्य स्थानी घेतले जाते. गारे यांनी कोकण व उत्तर महाराष्ट्रातील बहुतांश आदिवासी जमातीचा अभ्यास केला आहे. वारली, कातकरी, ठाकूर, भिल्ल इत्यादी महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमातींचे सखोल अध्ययन केले आहे. गारे यांनी आदिवासींची संस्कृती, जीवनमान, शैक्षणिक मागासलेपण, आर्थिक दुर्बलता, शासकीय योजनांचा त्यांच्यावर झालेला परिणाम, इत्यादी अशा घटकांचे सखोल अध्ययन केले आहे.( गारे:1998:46)

**(2) आर. व्ही. रसेल आणि हिरालाल(1996)**

यांनी मध्य भारतातील जाती आणि जमातीचा सखोल अभ्यास केला. त्यांनी महाराष्ट्रात आढळून येणाऱ्या अनेक आदिवासी जमाती चा सखोल अभ्यास केला. महाराष्ट्रातील प्रमुख असणाऱ्या भिल्ल जमातीचा अभ्यास केला आहे. आंध्र प्रदेशातील आदिलाबाद जिल्हात भिल्ल जमातीच्या लोकांचे वास्तव्य आहे. असे मत रसेल आणि हिरालाल हे आपल्या अध्ययनात मांडतात. नांदेड जिल्ह्यातील भिल्ल जमातीच्या लोकांना नाई कपोल किंवा नाईकडा या नावाने संबोधतात असे रसेल आणि हिरालाल म्हणतात.

**(3) टंडन,ए.(1950)**

टंडन यांनी पदव्युत्तर पदवीच्या अध्ययनासाठी 1937 मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सांगितलेल्या वर्धा शिक्षण योजनेचा अभ्यास केला. टंडन यांनी गांधीजींनी सांगितलेल्या शिक्षण योजनेतील सर्व घटकांचे अत्यंत बारकाईने अजून केले आहे. गांधीजी म्हणतात, भारतातील सद्यकालीन शिक्षण पद्धती ही विद्यार्थ्यांना नैतिक व मौलिक शिक्षण देणारी नाही. ब्रिटिशांनी भारतीय लोकांवर लादलेल्या शिक्षण पद्धतीतून विद्यार्थ्यांमध्ये स्वाभिमान जागृत होत नाही. गांधीजींच्या मते, विद्यार्थ्यांना शिक्षण मातृभाषेतून मिळावे. शिक्षण हे उद्योग केंद्री असावे., शिक्षणातून राष्ट्रीय भाषेचा विकास झाला पाहिजे.

**(4) दुबे,एस .एम.(1974)**

दुबे आणि आसाममधील अनुसूचित जाती व जमातीच्या महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यास केला आहे. दुबे आणि आपल्या अध्ययनात हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे की, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमी कशी आहे. सरकारच्या शैक्षणिक योजनांचा प्रभाव त्या विद्यार्थ्यांच्या जीवनावर किती आणि कसा पडत आहे. याचे अध्ययन दुबे यांनी केले आहे. दुबे यांनी आपल्या अध्ययनाच्या निष्कर्षात असे सांगितले आहे की, सरकारच्या शैक्षणिक योजनांचा प्रभावामुळे अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकांच्या जीवन शैली, राहणीमान, सामाजिक क्रियाकलाप, दैनंदिन व्यवहार इत्यादी घटकांमध्ये सकारात्मक



Scanned with CamScanner

प्रभाव पडला असून, शिक्षणामुळे व्यक्ती व समूहाच्या विकासाला दिशा मिळत आहे. असे दुबे आपल्या अध्ययनात स्पष्ट करतात.(Dubey:1974).

**(5) नाईक ,टी. बी.(1969)**

नाईक यांनी मध्य प्रदेशातील धार आणि झाबुवा या जिल्ह्यातील भिल्ल जमातीवर शिक्षणाच्या झालेल्या परिणामांचा अभ्यास केला आहे. नाईक यांनी भिल्लांच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करताना भिल्लांच्या जमाती अंतर्गत असणाऱ्या शैक्षणिक व समानतेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. नाईक यांच्या मते, भिल्ल जमातीमध्ये जमाती अंतर्गत शैक्षणिक असमानता ही मोठ्या प्रमाणात आहे. नाईक यांच्या मते, आर्थिक दृष्ट्या सक्षम असणाऱ्या भिल्लांचा सर्वाधिक शैक्षणिक विकास झाला. आर्थिक स्थिती मध्यम असणाऱ्या भिल्लांनी शासनातर्फे मिळणाऱ्या सोयी-सुविधांचा त्यात शिष्यवृत्ती, वसतिगृह, विद्यावेतन इत्यादींचा फायदा घेऊन व स्वतः कडील काही पैसे खर्च करून आपला शैक्षणिक विकास साधला. परंतु भिल्ल जमातीमधील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या ची मुलं आपल्या आई-वडिलांना अर्थार्जनासाठी मदत करण्याच्या कारणामुळे शिक्षणापासून वंचित राहिले आहे. असे नाईक आपल्या अध्यनात सांगतात.

**अध्ययनाचे उद्देश**

(1) स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी कल्याण कार्यक्रम जाणून घेणे.

(2) आदिवासींसाठीच्या शासनाच्या शैक्षणिक योजनांचा अभ्यास करणे.

(3) आदिवासींसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीचे स्वरूप जाणून घेणे.

(4) सरकार मार्फत आदिवासींसाठी राबवण्यात येणाऱ्या शैक्षणिक योजनांचे मूल्यमापन करणे.

**अध्ययन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी अन्वेषनात्मक संशोधन आराखडा उपयोगात आणण्यात आला आहे. अन्वेषनात्मक अध्ययनामुळे संशोधकाला त्याविषयाशी संबंधित असणाऱ्या विविध पैलूंचे ज्ञान होते. अध्ययनासाठी अभ्यासाचे क्षेत्र म्हणून, नांदेड जिल्ह्यातील भोकर (थेरबन), हिमायतनगर(पवना), हदगाव ( आनंदवाडी) आणि किनवट( परोटी ) या तालुक्यातील चार गावांचा अभ्यास करण्यात आला आहे. अभियानासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीचा आधारावर प्रत्येक गावातील 50 कुटुंबांतील शिक्षण योग्य वयाच्या एकूण 257 मुलांपैकी 200 विद्यार्थ्यांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे. अध्ययनासाठी प्राथमिक तथ्य संकलनाच्या तंत्रा पैकी मुलाखत, अनुसूची या तंत्राचा व दुय्यम तथ्य संकलनाच्या तंत्रा पैकी अध्ययनासी संबंधीत लिखित साहित्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन**

आदिम जीवनावरील परकीयांचे आक्रमण हे नवीन नाही. सर्व सामर्थ्यांनि युक्त असलेल्या ब्रिटिश आक्रमकांनी आदिवासींवर अन्याय, अत्याच्यार व त्यांचे शोषण करून खऱ्या अर्थाने त्यांना स्वातंत्र्यपूर्व काळात अनाथ करून टाकले होते. आदिवासींसाठी सर्वकाही असणाऱ्या जंगलावर ब्रिटिशांनी सामर्थ्याच्या बळावर ताबा मिळवून आदिवासींना देशोधडीला लावले. याचा परिणाम म्हणून आदिवासींच्या मनात ब्रिटिशां विषयी चीड निर्माण झाली. त्याचा परिणाम म्हणून आदिवासींनी ब्रिटिश राजसत्ता व त्यांचे हस्तक म्हणून काम करणारे जमीनदार, सरंजामदार यांच्याविरुद्ध बंड्या आणि लढा पुकारण्यास सुरुवात केली . सर्वप्रथम देशा त ब्रिटिश राज् सत्तेविरुद्ध बंड्रू पुकारण्याचे काम महानायक तट्या भिल्ल यांनी यशस्वी नेतृत्व करून केले. ब्रिटिशांचे आदिम लोकांविषयीचे धोरण हे सुरुवातीला नकारात्मक होते. परंतु आदिमाना पूर्णतः दुर्लक्ष करून आपल्याला व्यवस्थितपणे राज्य करता येणार नाही हे लक्षात आल्याने ब्रिटिशांनी आदिवासींच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. आदिवासींच्या प्रश्नांची आणि समस्यांची गुंतागुंत ब्रिटिशांच्या लक्षात आल्यानंतर आदिवासींच्या समस्यांकडे 1935 मध्ये ब्रिटिशांनी लक्ष देण्यास सुरुवात केली.



Scanned with CamScanner

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश शासनाबरोबर भारतातील समाजसुधारकांनी ही स्वातंत्र्य लढ्यातील व्यस्ततेमुळे आदिवासींच्या समस्यांकडे म्हणावे तसे लक्ष दिले नाही. कारण भारतातील तत्कालीन राजकीय पुढाऱ्यांकडून भारतास प्रथम स्वातंत्र्य प्राप्त करून देणे हेच उद्दिष्ट होते. परंतु त्यातही महात्मा गांधीं कडून प्रेरणा घेऊन अनेक समाजसुधारकांनी आदिवासींचे प्रश्न सोडविण्यास हातभार लावला आहे. यामध्ये ठक्कर बाप्पा यांनी 1922 मध्ये गुजरात येथे 'भिल्ल सेवा' ही संस्था स्थापन करून आदिवासींच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर श्री काकासाहेब बर्वे, शंकरराव ठकार, गोदूताई परुळेकर, भाऊसाहेब हिरे, बाळासाहेब खेर इत्यादी समाजसुधारकांनी आदिवासींच्या उन्नती मोलाचा वाटा दिला.( नाडगोंडे:2003: पृ. क्र.376)

भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आदिवासींच्या प्रश्नांची फार मोठी जबाबदारी राज्यकर्त्यांवर येऊन पडली होती. आदिवासी सारख्या दीर्घकालीन उपेक्षित राहिलेल्या जमातीचे प्रश्न म्हणजे, स्वतंत्र भारतासमोरील एक मोठे आव्हान होते. राज्यकर्त्यांना कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी समाजातील उपेक्षित, वंचित व समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या आदिवासींचा सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक समस्यांकडे लक्ष देऊन त्यांचे कल्याण साधण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची होती. म्हणून स्वतंत्र भारतात सत्तेवर आलेल्या सरकारांनी आदिवासींसाठी त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शासकीय व निमशासकीय पातळीवर काही योजना आखून त्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केला. " भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्यातील दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी विशेष काळजी घेण्याची आणि त्यांची सामाजिक अन्याय व इतर शोषणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय संविधानातील अशा मार्गदर्शक तत्त्वास अनुसरून पाचव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत मागासवर्गीयांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमांवर भर देण्यात आलेला होता. परंतु व्यक्ती हा केंद्रबिंदू मानून केलेल्या विकास योजना परिणामकारक होऊ शकल्या नाहीत. हे राज्यकर्ते लोकांना दिसून आल्यामुळे व्यक्तीचा परिसर विकास करणे आवश्यक वाटल्याने क्षेत्र विकास संकल्पना अस्तित्वात आली."(गारे:2000: पृ. क्र.27). याचा परिणाम म्हणून पुढील पंचवार्षिक योजनांमध्ये आदिवासींच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी भरीव तरतूद आणि योजनांची निर्मिती करण्यात आली. आदिवासींसाठी शासनाने निर्मित केलेल्या शैक्षणिक योजनांची फलश्रुती काय आहे. हे क्षेत्रीय अध्ययनाद्वारे प्राप्त तथ्यांच्या विश्लेषण व निर्वाचनावरून स्पष्ट होईल.

" भारतीय संविधानाच्या कलम 46 प्रमाणे शासनावर अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी शिक्षणाच्या व आर्थिक उन्नतीच्या दृष्टिकोनातून विशेष जबाबदारी टाकण्यात आली आहे. शिक्षण हा आदिवासी विकासाचा पाया समजून महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण, सांस्कृतिक विभागातर्फे दि.14 ऑगस्ट1972 च्या शासन निर्णयानुसार आश्रम शाळा समूह योजना मंजूर करण्यात आली. आश्रम शाळा हा विकास केंद्राचा एक भाग असून 5000 ते 7000 लोकसंख्येचा परिसर एका आश्रमशाळेच्या कक्षेत असावा असे ठरविण्यात आले आहे."(Ministry of tribal affairs:2014) डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींची सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उन्नती करण्यासाठी शासनाने आश्रम शाळा समूह योजना कार्यान्वित केली आहे. डोंगराळ भागात आदिवासी जमातीची लोकसंख्या 5000 ते 7000 असलेल्या विभागात आश्रम शाळा उघडण्यात येते. अशा आश्रम शाळा समूहात वसतिगृह, प्राथमिक शाळा यांचा समावेश आहे. अशा आश्रम शाळा समूहात वसतिगृह, प्राथमिक शाळा यांचा समावेश आहे. असे शाळांना जोडून असलेल्या वसतिगृहात राहणाऱ्या मुलांना दोन वेळचे जेवण, दोन गणवेश, अंथरून, पांघरून. पाठ्यपुस्तके, शालेय साहित्य, वैद्यकीय मदत दिली जाते. बाहेरून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण, गणवेश आणि सर्व शिक्षण मोफत दिले जाते. आश्रम शाळेतील मुला मुलींच्या शिक्षणासाठी त्यांच्या पालकांना कोणताही खर्च करावा लागत नाही. राज्यात 410 सर नांदेड जिल्ह्यात 72 आश्रम शाळा सध्या कार्यरत आहे जवळपास 2 लाख 50 हजार विद्यार्थी या आश्रम शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. नांदेड जिल्ह्यातील आधुनिक क्षेत्र असणाऱ्या गावातील उत्तरदात्यांना आश्रम शाळा समूह योजनेची तुम्हाला माहिती आहे का? असे विचारल्यानंतर142(71%) पालकांनी आम्हाला आश्रम शाळा बद्दल थोडीबहुत माहिती आहे, असे उत्तर दिले तर58 (29%) पालकांनी आम्हाला अशा योजनेबद्दल काहीच माहिती नाही असे उत्तर दिले. ज्या पालकांना आश्रम शाळेत



Scanned with CamScanner

बद्दल माहिती होती ती पण अपूर्ण आहे. फक्त अध्ययन क्षेत्रातील गावातील लोकांना आश्रम शाळे बद्दल एवढीच माहिती आहे की, त्या शाळेत मुलांना निवासी राहून मोफत शिक्षण मिळते. गावाजवळ आश्रम शाळेची व्यवस्था आहे का? आता प्रश्न विचारल्यानंतर अध्ययन क्षेत्रातील एका गावातील50(25%) उत्तर दात्यांनी हो आमच्या गावा जवळच आश्रम शाळा आहे असे उत्तर दिले. परोटी या अध्ययन क्षेत्रातील गावाजवळ 3 किमी अंतरावर सहस्त्रकुंड येथे पोस्ट बेसिक आश्रम शाळा आहे. तर150(75%) उत्तर दात्यांनी आमच्या गावाजवळ आश्रम शाळेची व्यवस्था नाही असे मत मांडले.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी मधून शिक्षण मिळावे याकरिता शासनाने इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळा ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्रातही राबविली जाते. अशा शाळेत इयत्ता 5 वी ते 10 वी पर्यंत शिक्षण देण्यात येते. अशा इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळा महाराष्ट्रात (1) पेठ रोड, नाशिक जि. नाशिक(2) बोर्डी ता. डहाणू जि. पालघर (3) तालुस्ते ( बडनेरा) ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.(4) चिखलदरा जि. अमरावती.(5) खैरी परसोडा ता. जि. नागपूर इत्यादी ठिकाणी स्थापन करण्यात आल्या आहेत. अशा निवासी शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था, भोजन, गणवेश, पुस्तके, शालेय साहित्य इत्यादी सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. केबल आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांना अशा शाळांमध्ये प्रवेश केला जातो. स्पर्धेच्या व माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात आदिवासी विद्यार्थी हा इंग्रजी भाषेच्या अज्ञानामुळे कुठेही मागे पडता कामा नये म्हणून केंद्र पुरस्कृत या योजनेची निर्मिती करण्यात आली आहे.नांदेड जिल्ह्यातील भील्ल जमातीचे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना सदर योजने बद्दल माहिती जमातीतील किती विद्यार्थी अशा एकलव्य इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. जाणून घेण्यासाठी मुलाखत अनुसूची च्या माध्यमातून पालकांना काही प्रश्न विचारण्यात आले होते. त्यातून या योजनेच्या संदर्भातील काही बाबी स्पष्ट झाल्या आहेत. शासनाने आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या एकलव्य इंग्रजी माध्यमांच्या शाळेबद्दल तुम्हाला काही माहिती आहे का? हा प्रश्न पालकांना विचारल्यानंतर तेव्हा केबल40 (20%) पालकांनाच इंग्रजी माध्यमांच्या या शाळेबद्दल ची माहिती होती. तर160 (80%) पालकांना या योजने बद्दल काहीही माहिती नव्हती. केवळ 20 टक्के पालकांना हे कसे काय माहित झाले असे विचारल्यानंतर त्यांनी सांगितले की, आमच्या गावात काही दिवसापूर्वी जमातीचा समाज प्रबोधन मेळावा आयोजित केला होता. त्या मेळाव्यात जमातीच्या शिक्षित कार्यकर्त्यांनी आपल्या भाषणात या योजनेबद्दल माहिती दिली असे उत्तर मिळाले. अध्ययन क्षेत्रातील 4 गावातील एकही विद्यार्थी एकलव्य इंग्रजी शाळांमधून शिक्षण घेत नाही. किंवा आज पर्यंत जमातीतील कोणतेही विद्यार्थ्यांनी एकलव्य इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिक्षण घेतले नाही. थोडक्यात असे म्हणता येते की, भिल्ल जमातीतील विद्यार्थी आणि पालक यांच्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळा बद्दल अनभिज्ञता आहे.

देशाच्या आर्थिक विकासात शिक्षणाचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. निर- निराळ्या विकास योजना राबविण्यासाठी आवश्यक असणारे कार्यक्रम व प्रशिक्षित मनुष्यबळ वाढवून मानवी भांडवल निर्माण करण्याचे शिक्षण हे मुख्य साधन आहे .परंतु देशात प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमांची निर्मिती केली, विद्यार्थ्यांना कुशल व प्रशिक्षित बनविण्यासाठी वेगवेगळ्या व्यावसायिक व तंत्र शिक्षण संस्थांची निर्मिती केली. या संस्थांचे योगदान राष्ट्राच्या आर्थिक विकासात मोलाचे राहावे यासाठी शासनाने व्यावसायिक शिक्षणाची संबंधित अनेक योजना तयार करून त्याची अंमलबजावणी केली आहे. देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासात व्यवसायिक शिक्षणाची भूमिका ही पुढील काळात निर्णायक राहणार आहे. हे शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर शासनाने देशातील आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल घटकांनाही विकासात सहभागी करून घेण्यासाठी आदिवासींना व्यावसायिक शिक्षणासाठी वेगवेगळ्या सोई सुविधा देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. नांदेड जिल्ह्यातील भिल्ल जमातीचे अध्ययन क्षेत्र असलेल्या गावातील किती विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत, हे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यासाठी मुलाखत अनुसूची च्या माध्यमातून पालकांना विचारण्यात आले की, तुमच्या कुटुंबातील कोणी पालक व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित आहे का? केवळ 4(2%) पालकांनी सांगितले की आमचा पाल्य व्यवसायिक शिक्षण घेत आहे. तर 196 (98%) पालकांनी सांगितले की आमच्या



Scanned with CamScanner

कुटुंबातील कोणीही पाल्य व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित नाही. त्यात अध्ययन क्षेत्रातील आनंदवाडी गावातील 2 दोन जण व परोटी या गावातील 2 विद्यार्थी व्यवसायिक अभ्यासक्रमात प्रवेशित आढळले. थेरबन आणि पवना या गावातील एकही विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेशित नाही.

**सारांश**: अशाप्रकारे वरील सर्व तथ्यांचे विश्लेषण व निर्वाचनावरून आपणास सारांश रूपाने असे म्हणता येते की, भिल्ल जमातीची शैक्षणिक प्रगतीही म्हणावी तेवढी समाधानकारक नाही. शासनाने आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक योजनांची सुरुवात केली. त्यातील काही प्रातिनिधिक स्वरूपाच्या योजनांचा आढावा घेऊन भिल्ल जमातीच्या विद्यार्थ्यांना अशा योजनांचा किती प्रमाणात उपयोग झाला हे बघितले तर आजही शासनाच्या शैक्षणिक योजना संपूर्ण सफल झाला नाहीत असेच वरील सर्व तथ्यांच्या विश्लेषनावरून दिसून येते. शासनाचे शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीत अनेक दोष आढळून येत आहे. म्हणून भिल्लांच्या शैक्षणिक उन्नतीत अडथळे निर्माण होत आहेत.

**अध्ययनाचे निष्कर्ष**

(1) भील्ल जमातीतील विद्यार्थ्यास शिक्षण न मिळण्यास शासन व शासनाच्या योजना अधिक जबाबदार आहेत, असे बहुतांश उत्तर दात्यांनी मत नोंदविले आहे.

(2) शासनाच्या शैक्षणिक योजनांची माहिती भिल्ल जमातीतील अनेक लोकांना नाही.

(3) शासनाचे शैक्षणिक योजनांच्या लाभापासून अजूनही वंचित असणाऱ्या कुटुंबांची संख्या भिल्ल जमातीत अधिक आहे.

(4) आश्रम शाळेत शिक्षण प्राप्त करणाऱ्या भिल्ल जमातीतील विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प आहे.

(5) जिल्ह्यातील बहुतांशी आदिवासी बहुल गावाजवळ आश्रम शाळांची व्यवस्था नाही.

(6) शासकीय वसतिगृह योजनेबद्दल बहुतांश आदिवासींना माहिती आहे व या योजनेबद्दल आदिवासी लोक बऱ्याच प्रमाणात समाधानी आहेत.

(7) भिल्ल जमातीत व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण फार कमी आहे.

(8) औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक शिक्षणासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रमाण जमातीत अत्यल्प आहे.

(9) शासनाचे शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीत दोष आढळून येतो. याचे मुख्य कारण म्हणजे आजही 95% आदिवासींना त्यांच्यासाठी असणाऱ्या शैक्षणिक योजनांची माहिती नाही.

**शिफारशी**

(1)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मतानुसार समाजातील उपेक्षित व वंचितांना न्याय व समानता प्राप्त करून देण्यासाठी शिक्षणाची सोय आणि व्यवस्था समाजातील अंतस्थ घटकांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे.

(2)- आदिवासींमध्ये शासनाच्या शैक्षणिक योजनांविषयी जनजागृती करणे गरजेचे आहे.

(3)- शासनाच्या शैक्षणिक योजनांचा लाभ पात्र असणाऱ्या प्रत्येक आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणे गरजेचे आहे.

(4)- आश्रमशाळांमधील भ्रष्टाचारावर प्रतिबंध घालने गरजेचे आहे.

(5)- वसतिगृह बाबत भिल्ल जमातीच्याआदिवासींमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे.

(6)- व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीच्या निर्वाह भत्तात वाढ करण्याची गरज आहे.

(7)- शैक्षणिक योजनांचा निरपेक्ष व तठस्थ अंमलबजावणीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

(8)- भिल्ल जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक योजनांचा फायदा घेण्यासाठी जमातीच्या प्रमाणपत्राचा दाख ला द्यावा लागतो, हा दाखला भिल्ल जमातीतील लोकांना प्रशासनामार्फत दिल्या जात नाही त्यामुळे दिल्या जमातीचे विद्यार्थी शासनाच्या शैक्षणिक योजनांच्या लाभापासून वंचित राहत आहेत. त्यांची ही वंचितता दूर करण्यासाठी त्यांच्या जमातीच्या प्रमाणपत्र चा प्रश्न लवकर निकाली काढावा.



Scanned with CamScanner

## संदर्भ ग्रंथ सूची

गारे, गो. (1994). आदिवासींचे प्रश्न आणि परिवर्तन. औरंगाबाद, अमृत प्रकाशन.
वाघमारे, जे.(2009). बदलते शिक्षण: स्वरूप आणि समस्या. पुणे, पद्मगंधा प्रकाशन.
गॅझेटिअर, (2011). नांदेड जिल्हा गॅझेटियर,( खंड-1). मुंबई, महाराष्ट्र शासन प्रेस.
नाईक, टी.(1956). दी भील्स, ए स्टडी
गारे, जी.(1998) भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती. औरंगाबाद, अमृता प्रकाशन.
*Tandan, A.(1950) .The Wardha Scheme,masters degree ,thesis in Education Allahbad University.*
*Dubey. S.(1974).The study of scheduled Caste and Scheduled tribe college Students in Assam,ICSSR.*
नाडगोंडे, जी.(2003) . भारतीय आदिवासी. पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
गारे, जी.(2000). आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ. पुणे, सुगावा प्रकाशन.
*Ministry of tribal affairs,(2014).Report of the high level committee on Socio -Economic,Health and Educational Statues of Tribal Community Of India ,New Delhi.*



Scanned with CamScanner